नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

प्रेस नोट

दिनांक 04/10/2021 (सोमवार)

(सकाळ)

घरफोडी

पो.स्टे. जलालखेडा :– अंतर्गत सोमेश्वर किल्ला जालालखेडा येथे दिनांक 03/10/2021 चे 12.00 वा. ते 06.00 वा. दरम्यान सोमेश्वर किल्ला देवस्थान जलालखेडा येथील लोखंडी गेट चे कुलुप अज्ञात आरोपीने तोडुन मंदीरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने मंदीरातील लोखंडी पेटीचे कुलुप तोडुन त्यातील चांदीचा नाग व चांदीचा परकोड (पिंड) वजन अंदाजे 07 किलो किमान 2,10,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिल माधव प्रसाद चौधरी वय 58 वर्ष, रा. वार्ड क्र 04 जलालखेडा ता.नरखेड जि.नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रभूदास दलाल मो. न. 9561564852 हे करीत आहे.

अनैसर्गिक संभोग

पो.स्टे. सावनेर :– दि. 03/02/2021 चे 13.00 वा. ते दि. 27/06/2021 चे 15.00 वा. सुमारास आरोपी नामे– 1) भुषण अशोक खंडेराव वय 24 वर्ष, रा. खापरखेडा जि. नागपूर याने त्याच्या मित्राचा वाढदिवस असल्याचे कारण सांगुन फिर्यादी/पीडिता वय 19 वर्ष हिला सावनेर येथील प्रतीक लॉज येथे नेले व फिर्यादीशी जबरदस्तीने शारीरिक संबध प्रस्थापित केले. दि 02/06/2021 रोजी आरोपीने फिर्यादी सोबत अनैसर्गिक संबंध बनवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. तसेच दि 25/06/2021 व दि 27/06/2021 रोजी आरोपी क्र. 2) अक्षय अशोक खंडेराव, वय 30 वर्ष, रा. खापरखेडा जि. नागपुर हा फिर्यादीच्या रूममध्ये येवून पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 376, 377, 354, 498 (अ), 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास परी मपोउपनि प्रियंका गेडाम मो.नं. 9503973657 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर